सं. फौ. ख. क्र. ३८२/२०२२

CNR No.MHBI100019182022

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | :- | १०/१०/२०२२ |
| नोंदणी तारीख | :- | १०/१०/२०२२ |
| निकाल तारीख | :- | १४/०६/२०२४ |
| कालावधी | :- | ०१ ०८ ०४<br>वर्षे महिने दिवस |

| **केज येथील न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, केज यांचे न्यायालयात**<br>( पिठासीन अधिकारी : एन.डी.गोळे ) | |
|---|---|
| न्यायनिर्णयाची तारीख | **१४/०६/२०२४** |
| **प्रकरण क्रमांक**<br>तक्रारकर्ता/ अभियोग पक्ष | **संक्षिप्त फौजदारी प्रकरण क्रमांक ३८२/२०२२**<br>**महाराष्ट्र शासन** मार्फत/ व्दारा ठाणे अंमलदार, केज पोलिस स्टेशन, (फिर्यादी- बजरंग मोहनराव इंगोले) |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | श्री. एस. एस. देशपांडे<br>(सुविद्य सहाय्यक सरकारी अभियोक्ता ) |
| आरोपी | सखाराम लाला जगताप,<br>वय – ६५ वर्षे,<br>रा. साळेगांव, ता. केज, जि. बीड |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | श्री. एस.आर. मोरे, (बचाव पक्षातर्फे सुविद्य विधीज्ञ) |

## न्यायनिर्णय

## (निकाल तारीख १४ जुन, २०१९)

प्रस्तुतचा खटला आरोपीविरूध्द मुंबई जुगार प्रतिबंध अधिनियम, १८८७ चे कलम १२ (अ) प्रमाणे आरोपपत्र दाखल करण्यात आले.

सरकार पक्षाची थोडक्यात हकीकत पुढीलप्रमाणे :

२. दिनांक २८.०९.२०२२ रोजी १४.५८ वाजता फिर्यादी बजरंग मोहनराव इंगोले हे कर्तव्यावर हजर असतांना त्यांना गूप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली

की, एक इसम नामे सखाराम लाला जगताप हा साळेगाव गावामध्ये गणेश कृषी सेवा केंद्र दुकानाचे समोर बसुन कल्याण मटका खेळत व खेळवित आहे. अशा माहितीप्रमाणे फिर्यादीने व इतर पोलिस स्टाफसह घटनास्थळी जाउन रेड केली असता, आरोपींच्या ताब्यातून वरली मटका साहित्य व नगदी १२१० रू. असा माल व साहित्य जप्त केले. त्यानंतर आरोपीविरूध्द गून्हा दाखल केला.

३. प्रस्तुत खटल्याचे न्यायनिर्णयासाठी खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित झाले. सदर मुददयांवरील माझा निष्कर्ष कारणमीमांसेसह मुद्दायांसमोर लिहीत आहे.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १. दिनांक २८.०९.२०२२ रोजी यातील नमूद आरोपी हे साळेगाव गावामध्ये गणेश कृषी सेवा केंद्र दुकानाचे समोर लोकांकडून पैसे घेउन जूगार खेळ चालवित होते व त्याव्दारे मुंबई जुगार प्रतिबंध अधिनियमण,१८८७ चे कलम १२ (अ) अन्वयेअपराध केल्याचे अभियोग पक्षाने शाबीत केले आहे काय ? | **नकारार्थी** |
| २. आदेश काय ? | **आरोपी निर्दोष मुक्त** |

## <u>का र ण मि मां सा</u>

४. अभियोगपक्षातर्फे प्रस्तुत खटल्याचे कामी तीन साक्षीदार तपासण्यात आले. अभियोग पक्षाचे इतर साक्षीदार यांना वेळोवेळी साक्षी समन्स पारीत केले असता ते याकामी हजर झाले नाहीत. सबब अभियोग पक्षाचा पुरावा बंद करणेबाबात नि. १ खाली आदेश पारीत करण्यात आला. सदरचे प्रकरण हे दोन वर्षाहून अधिक जूने आहे. आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३(१) (ब) अन्वये निवेदन नि. २० वर नोंदविण्यात आले.

**मुद्दा क्र. १ बाबत :–**

५. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार बजरंग मोहनराव इंगोले (फिर्यादी) यांच्या कथनानुसार दि. २८.०९.२०२२ रोजी पोलिस स्टेशन केज येथे कर्तव्यावर हजर असतांना त्यांना मिळालेल्या गुप्त बातमी वरून अशी माहिती मिळाली की, साळेगाव येथे गणेश कृषी केंद्रा समोर जगताप नामक व्यक्ती विनापरवाना वरली मटका खेट करत आहे. मिळालेल्या माहिती प्रमाणे फिर्यादीने दोन पंचांना सोबत घेतले व घटनास्थळावर गेले. छापा दुपारी ३ वाजता तिथे फिर्यादीला आरोपी मिळून आला व ग्राहक हे घटनास्थळावरुन पळून गेले. पंचासमक्ष आरोपी सखाराम लाला जगताप यांचे अंगझडती घेतली. झडती दरम्यान आरोपी कडून पेन, कारबन, वरली मळक्याच्या चिठ्ठया व १२१० रुपये मिळून आले. पंचासमक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा पोलिस नाईक गुंजळ यांनी केला. आरोपीला सोबत घवुन पोलिस स्टेशनला सखाराम जगताप यांच्या विरुध्द फिर्यादीने तक्रार नोंदविली.

६. साक्षीदार क्र. २ राजू गूंजाळ हे पोलिस साक्षीदार आहे. सदर साक्षीदार हे इतर पोलिस स्टाफसह घटनास्थळावर हजर होते. सदर साक्षीदाराने फिर्यादीच्या कथनास सहकार्य केले आहे. सदर साक्षीदाराने दोन पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला आहे व सरतपासात पंचनामा सिध्द केलेला आहे. पंचनामा नि.क्र. १८ वर आहे. साक्षीदार क्र. ३ चंद्रकांत काळकूटे हे तपासी अंमलदार आहे. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास सहकार्य केलेले आहे. सदर साक्षीदाराने साक्षीदारांचे तपास टिपण नोंदवून आरोपी विरुध्द दोषारोपपत्र दाखल केले आहे.

७. फिर्यादी यांनी उलटतपासात कबूल केले की, छापा मारण्याचे ठिकाण कोणाच्या मालकीचे आहे हे सांगता येत नाही. तसेच तपासी अंमलदार यांनी सूध्दा छापा मारल्याचे ठिकाण कोणाच्या मालकीचे आहे याबद्दल त्यांनी चौकशी केली नाही.

८. सदर प्रकरणात अभियोग पक्षातर्फे फिर्यादीच्या कथनास समर्थनार्थ एकही स्वतंत्र साक्षीदार तपपासण्यात आलेले नाही. फिर्यादीच्या कथनानूसार घटनास्थळ

हे रहदारीचे ठिकाण व आरोपीस पकडले तेव्हा गर्दी होती अशा वेळेस घटनास्थळावरील स्वतंत्र साक्षीदार तपासण्यात अभियोग पक्षास अपयश आले आहे.

९. अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे दोन पंचासमक्ष घटनास्थळावरून मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. अशा परिस्थितीत स्वतंत्र साक्षीदार म्हणजेच ते दोन पंच यांचा पुरावा अभिलेखावर येणे अभिप्रेत होते. परंतू जप्त करण्यात आलेला मुद्येमाल याचा विगतवार तपशिल व त्यांचा आरोपींकडे सजग ताबा होता, ही बाब स्वतंत्र साक्षीदार यांच्या पुराव्यातुन शाबीत झालेली नाही. अभिलेखाचे अवलोकन करता सदरहु आरोपी यांच्या जवळ कोणते चिठ्ठ बूक, पेन व कार्बन आणि सदर खेळात कोणत्या व्यक्तीने किती पैसे लावले होते, याबाबत कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर आलेला नाही. सबब आरोपीस निर्दोष सोडण्याखेरीज दुसरा पर्याय राहत नाही. प्रस्तुत खटल्यातील मुद्देमाल म्हणजेच रोख रक्कम रूपये १२१० /- ही सरकार जमा करणे न्यायोचित ठरेल. तसेच जूगाराचे चिठ्ठ बूक, पेन व कार्बन हे मुल्यहीन असल्याने, त्यांचा नाश करणे न्यायोचित ठरेल. सबब मुद्दा क्रमांक १ बाबत माझा निष्कर्ष मी नकारार्थी नोंदवित असून, मुद्दा क्रमांक २ बाबत खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. आरोपी नामे सखाराम लाला जगताप यास मुंबई जुगार प्रतिबंध अधिनियम, १८८७ चे कलम १२(अ) गुन्हयान्वये त्यास फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५५(१) नुसार निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचा वैयक्तिक जातमुचलका व जामीन कदबा रद्द करण्यात येतो.

३. आवाहनाचा कालावाधी संपुष्टात आल्यानंतर, प्रस्तुत खटल्यातील मुद्देमाल जप्त रोख रक्कम रू. १२१०/- (अक्षरी बाराशे दहा रू. मात्र) ही सरकारजमा करणेत यावी. तसेच जूगाराचे चिठ्ठ, पेन व कार्बन यांचा नाश

करण्यात यावा.

४. आरोपीने रक्कम रूपये पंधरा हजार रूपयांचा वैयक्तिक जातमूचलका व जामीन कदबा हा प्रस्तुत न्यायनिर्णयाच्या विरूध्द मा. वरिष्ठ न्यायालय यांचे न्यायालयात आवाहन अथवा अर्ज दाखल केल्यास त्याकामी हजर राहणेसाठी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७–अ अन्वये देण्याचे आहे.

( सदरहु न्यायनिर्णय खुले न्यायालयात जाहीर केला.)

सही/–

( एन.डी. गोळे )

दिनांक – १४.०६.२०२४ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, केज